लोकमत

# भारत सहकारातूनच महासत्ता बनेल

## स्वरूप खारगे : 'रवळनाथ'च्या सहकार सप्ताहास प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज :** सहकार चळवळीमुळेच विकासाला गती मिळाली आहे. त्यामुळे सहकाराच्या संवर्धनासाठी नियोजनपूर्वक प्रयत्नांची गरज आहे. सहकार चळवळीतूनच देश महासत्ता बनेल, असा विश्वास मुख्याधिकारी स्वरूप खारगे यांनी व्यक्त केला.

अखिल भारतीय सहकार सप्ताहानिमित्त रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी, ज्ञानदीप प्रबोधिनी व इंटेट करिअर अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते. सेवानिवृत्त अपर पोलीस अधीक्षक सुहास नाडगौडा प्रमुख उपस्थित होते.



गडहिंग्लजमधील कार्यक्रमात स्वरूप खारगे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी एम. एल. चौगुले, सुहास नाडगौडा उपस्थित होते.

नाडगौडा म्हणाले, देशाच्या विकासासाठी सहकाराशिवाय पर्याय नाही. परंतु, कायदेशीर बाबींचे पालन केले तरच सहकारी चळवळ मजबूत होईल. चौगुले म्हणाले, सर्व हितचिंतक व सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक व कर्मचाऱ्यांच्या योगदानामुळेच 'रवळनाथ'ची प्रगती झाली आहे.

रामचंद्र निळपणकर, महेश मजती, मीना रिंगणे, संदीप कागवाडे, मनोहर गुरबे, शिवानंद घुगरे आदी उपस्थित होते. मुख्याधिकारी खारगे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. दत्ता पाटील यांनी प्रास्ताविक केले. गौरी बेळगुद्री यांनी सूत्रसंचालन केले. सागर माने यांनी सहकाराची प्रतिज्ञा दिली. दत्तात्रय मायदेव यांनी आभार मानले.

आजरा, गडहिंग्लज, नेसरी, चंदगड, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगाव, निपाणी व कुडाळ शाखेतही सप्ताह साजरा केला जात आहे, असेही चौगुले यांनी सांगितले.